बीड। शनिवार
१९.०४.२०२५
वर्षे : ५ अंक : १९
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 




# रक्त साकळलं,शरीर काळंनिळं पडलं; क्रूरतेचा कहर!
# अंबाजोगाई मध्ये महिलेला मारहाण !!






**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई सत्र न्यायालयात वकिली करणाऱ्या ज्ञानेश्वरी अंजान या तरुणीला गावाचा सरपंच आणि त्याच्या कार्यकर्त्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. १४ एप्रिल रोजी ज्ञानेश्वरी अंजान हिला मारहाण करण्यात आली होती. सरपंच आणि त्याच्या कार्यकर्त्यांनी पाईपने ज्ञानेश्वरीला प्रचंड मारले. ही मारहाण इतकी भीषण होती की, ज्ञानेश्वरी अंजान यांच्या अंगातील रक्त साकळले असून त्यांच्या पाठीवर काळे-निळे वळ उठले होते. ही घटना उघडकीस आल्यानंतर एकच खळबळ उडाली. अंबाजोगाईतील सनगाव येथील ज्ञानेश्वरी अंजान हिला मायग्रेन आणि पाठीच्या दुखण्याचा त्रास असल्याने तिला बोलतानाही प्रचंड त्रास जाणवत होता. तिने सांगितले की,तिने सांगितले की, २३ फेब्रुवारी २०२३ रोजी गावातील एका मंदिराच्या भोंग्याचा आवाज तीव्र होता. मी त्यावेळी अभ्यास करत होते. जास्त आवाजामुळे माझं अभ्यासात लक्ष लागत नव्हते. मी त्यावेळी सरपंच अनंत अंजान यांना फोन करुन भोंग्याचा आवाज कमी करायला सांगितला. त्यांनी मी कर्मचाऱ्याला आवाज कमी करायला सांगतो, असे सांगितले. मात्र, दोन तास उलटूनही काही झाले नाही. मी पुन्हा फोन केला तेव्हा कर्मचारी माझा कॉल उचलत नसल्याचे सरपंचांनी सांगितले. त्यामुळे मी संबंधित कर्मचाऱ्याच्या घरी जाऊन देवळातील भोंग्याचा आवाज कमी करायला सांगितले तेव्हा मी नॉनव्हेज खाल्ल्याने मंदिरात जाऊ शकत नाही, ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● ॲड. ज्ञानेश्वरी अंजान यांच्यावर झालेला हल्ला हा पुरुषसत्ताक मानसिकतेतून झाला: दीपक केदार

ॲड. ज्ञानेश्वरी अंजान यांना झालेल्या मारहाणीनंतर आता बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी बीडसाठी वेळ देण्याची मागणी होत आहे. बीडमध्ये कायदा व सुव्यवस्था राखली जात नाही. पालकमंत्र्यांनी वेळ द्यावा अन्यथा त्यांनी राजीनामा द्यावा असे दीपक केदार म्हणाले. ज्ञानेशरीवर झालेला अमानुष हल्ला हा क्रूरपणाचा कळस गाठणारा आणि मानवतेला काळीमा फासणारा आहे. पुरुषसत्ताक मानसिकतेतून हा हल्ला झालेला आहे. आरोपींवर मोकासारखी कारवाई झाली पाहिजे. कायदा हातात घेणाऱ्यांची गय करु नका. त्यांची धिंड काढा, जिजाऊंच्या लेकीवर हा हल्ला झाल्याचे दीपक केदार म्हणाले आहेत.

### ● १० जणांवर गुन्हा दाखल

वकील ज्ञानेशरी श्रीधर अंजान मारहाणप्रकरणी सरपंच अनंत रघुनाथ अंजान यांच्यासह सुधाकर रघुनाथ अंजान, राजकुमार ज्ञानोबा मुंडे, कृष्णा ज्ञानोबा मुंडे, ज्ञानोबा बब्रुवान रपकाळ, नवनाथ ज्ञानोबा जाधव, मृत्युंजय पांडुरंग अंजान, अंकुश बाबुराव अंजान, सुधीर राजाभाऊ मुंडे, नवनाथ दगडू मोरे या दहा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### ● पोलिसांनी काय सांगितलं आहे ?

१४ एप्रिल रोजी ६ वाजण्याच्या सुमारास ज्ञानेश्वरी श्रीधर अंजन (रा. सानगाव, ता. अंबाजोगाई. जि. बीड) यांना गावातील मंदिरावर लावलेल्या स्पीकर, भोंगे, गावातील पीठाच्या चक्की द्वारे होणाऱ्या ध्वनी प्रदूषणाबाबत बाबत वेगवेगळ्या कार्यालयात दिलेल्या तक्रारीचा राग मनात धरून तसंच कोर्टात सुरू असलेल्या खुनाच्या प्रयत्नाची केस काढून घे म्हणत सनगाव गावातील सरपंच व इतर नऊ आरोपींनी त्याना, त्यांचे चुलते श्रीधर अंजन, चुलती अर्चना अंजन याना लाकडी काठ्या व रबरी पाईपने मारहाण केली. तक्रारीच्या आधारे युसूफ वडगाव पोलिस ठाणे गु. र. क्र. ११३/२०२५ कलम ११८(२), ११८(१), ११५(२), ७४, १८९(२), १९०, १९१(२), ३५२, ३५१(२) इछडप्रमाणे गुन्हा नोंद असून सदर गुण्यातील आरोपीचा युसूफ वडगाव पोलिस ठाणे येथील तपास पथक शोध घेत आहे.

# बीड पोलिसांना सवाल; एका चोरीनंतर 'आवादा'ला सुरक्षा; मग गरिबांच्या चोऱ्यांचे काय?



**बीड । प्रतिनिधी**

मस्साजोग येथील आवादा कंपनीकडे खंडणी मागण्यासाठी आलेल्या लोकांना विरोध केल्याने सरपंच संतोष देशमुख यांचा बळी गेला. त्याच कंपनीत दोन वेळा चोरी झाली. बीड पोलिसांनी कसलाही विलंब न करता तातडीने पोलिस बंदोबस्त दिला. शिवाय चोरटे शोधून मुद्देमालही हस्तगत केला. परंतू मागील ३ महिन्यात शेकडो गरिबांचे घर फोडले, कष्टाचे पैसे चोरट्यांनी नेले. त्यांच्या घराला सुरक्षा देणे तर सोडाच, पण चोरीच्या गुन्ह्यांचा शोध अद्याप लागलेला नाही. बीड पोलिस काय केवळ धनदांडग्यांसाठीच काम करतात का? असा सवाल उपस्थित होत आहे. पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांची भूमिकाही संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणापासून बीड पोलिस वादाच्या भोवऱ्यात सापडले ▶▶ उर्वरित पान २ वर

# ५० हजाराची लाच घेतांना कार्यकारी उप अभियंत्यासह तिघे जाळ्यात

**बीड । प्रतिनिधी**

बीड एसीबीची कारवाई एकावर होतांना दिसतच नाही. प्रत्येकवेळी लाचखोरांची संख्या ही दोन, तीन पेक्षा जास्तच असते. यावरुन लाच स्विकारणार्या कार्यालयातील सगळीच यंत्रणा भ्रष्टाचाराने बरबटलेली असल्याचे दिसून येते. सध्या महावितरणकडून ग्राहकांची जोरात लूट सुरु आहे. नवीन मीटर बसवणे, वीज जोडणी देणे यासाठी सर्रास पैशांची मागणी केली जात आहे. बीड एसीबीने पात्रुड येथे वीज चोरीचा दंड न टाकण्यासाठी पावणे दोन लाखांच्या लाचेची मागणी करुन तडजोडअंती ५० हजार स्विकारण्याचे मान्य केले. ही लाच स्विकारल्याप्रकरणी उपअभियंता, वायरमन, खाजगी इसम अशा तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महावितरणचे कार्यकारी उपअभियंता विवेक जनार्धन मवाडे, वायरमन शेख जलील शेख अब्दुला, खाजगी इसम मोमीन मोहीब अशी लाचखोरांची नावे आहेत. माजलगाव तालुक्यातील पात्रुड येथे तक्रारदाराचे चहापाण्याचे हॉटेल आहे. त्यांचे मीटर जळाल्यामुळे वायरमनच्या परवानगीने दुसरीकडून लाईट घेतली. ही बाब वायरमनने कार्यकारी उपअभियंता यांना सांगून दंडाची भीती दाखवून पैसे उकळण्याचा प्लॅन बनवला. त्याप्रमाणे हॉटेलची झडती घेऊन वीजचोरी पकडली व पावणे दोन लाख रुपये दंडाची भीती दाखवली. तडजोडीत ५० हजार रुपये स्विकारण्याचे मान्य केले. बीड एसीबीने सापळा रचला. कार्यकारी उपअभियंत्याच्या सांगण्यावरुन वायरमनने ही लाच खाजगी इसमाच्या स्वाधीन केली. याप्रकरणी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. ही कारवाई उपअधीक्षक शंकर शिंदे यांच्या उपस्थितीत सुरेश सांगळे, श्रीराम गिराम, भरत गारदे, खरसाडे, राठोड, हनुमान गोरे, गणेश म्हेत्रे, पुरी यांनी केली.

# डॉ.ज्योती मेटे यांनी रुग्णालय प्रशासन धरलं धारेवर
# छाया पंचाळ मृत्यूप्रकरणी डॉ. ज्योती मेटे आक्रमक

## जिल्हा शल्यचिकित्सकांची घेतली भेट ; प्रसुती विभागाचीही केली पाहणी



**बीड । प्रतिनिधी**

मागील आठवड्याभरात जिल्हा रुग्णालयात प्रसुतीसाठी दाखल झालेल्या तीन महिलांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. ही बाब वैद्यकीय क्षेत्राला काळीमा फासणारी असून सर्वसामान्यासाठी वैद्यकीय सेवेचा आधार असलेल्या शासकीय रुग्णालयात अशी घटना घडल्याने सर्वसामान्य कुटुंबातील गोरगरीब रुग्णांनी उपचार कुठे घ्यायचा असा प्रश्न निर्माण झाला आहे. आज दि १८ रोजी सकाळी शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी शासकीय रुग्णालयाला भेट देत तेथील प्रसूती विभागाची पाहणी केली आणि जिल्हा शल्यचिकित्सक यांची भेट घेत दोषीवर वर कारवाई करण्याची मागणी करत रुग्णालय प्रशासन धारेवर धरलं.

छाया गणेश पांचाळ रा. अंबीलवडगाव, ता. बीड यांना जिल्हा रुग्णालयात प्रसूतीसाठी दाखल करण्यात आले होते. प्रसुती झाल्यानंतर काही वेळातच अचानक रक्तस्रावचा त्रास सुरू झाला. याबाबत नातेवाईकांनी नर्सला माहिती दिली. पण त्यांनी ऐकून न घेता उद्धट भाषा वापरत दुर्लक्ष केले. यानंतर मातेचा मृत्यु झाला. ही घटना जिल्हा ▶▶ उर्वरित पान २ वर

# बनकरंजा येथील दलित वस्तीच्या १८ लाखाच्या कामात भ्रष्टाचार

- अधिकारी गुत्तेदार यांच्या संगणमताने बोगस काम करून निधी हडप करण्याचा प्रयत्न
- दलित वस्तीत नाली कामाची आवश्यकता असताना पैसे मिळावे म्हणून बसवले एलईडी
- पंचायत समिती येथून ग्रामपंचायतला कामाचे पैसे वर्ग करण्यात आले

बनकरंजा येथे दलित वस्ती अंतर्गत साठे नगर व बौद्ध नगर येथे बोगस झालेल्या कामाच्या संदर्भात केज पंचायत समिती बिडिओ समृद्धी दिवाने – काळे मॅडम यांना चौकशी करण्यासाठी फोन केला असता त्यांनी फोन उचलला नाही.

**केज । प्रतिनिधी**

केज तालुका येथील बनकरंजा गावांतर्गत दलित वस्ती साथी १८ लक्ष रुपयाचा निधी मंजूर असताना या निधीचा निव्वळ गुत्तेदार आणि अधिकारी यांनी बोगस काम करून पैसे उचलण्याचा प्रकार समोर आला आहे बनकरंजा गाव अंतर्गत साठे नगर ▶▶ उर्वरित पान २ वर



# पाटोदा ग्रामीण रुग्णालयातील १०८ ॲम्बुलन्स सेवा वारंवार बंद
# गंभीर रुग्णांना जीव गमवण्याची वेळ




**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा ग्रामीण रुग्णालयातील १०८ आपत्कालीन रुग्णवाहिका सेवा वारंवार बंद राहत असल्याने संपूर्ण तालुक्यात संतापाची लाट उसळली आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी या सेवेसाठी कॉल केल्यास ॲम्बुलन्स उपलब्ध नसेल,किंवा गाडी बंद आहे असे सांगण्यात येते. यामुळे गंभीर रुग्णांच्या नातेवाईकांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. नुकत्याच एका प्रकरणात रात्रीच्या सुमारास एका गंभीर रुग्णाला हॉस्पिटलमध्ये दाखल करावं लागत असताना १०८ ॲम्बुलन्स उपलब्ध झाली नाही. नाईलाजाने खाजगी वाहनातून बीडला हलवावे लागले. वेळेवर उपचार न मिळाल्याने रुग्णाची प्रकृती अधिकच बिघडली



यामुळे पाटोदा ग्रामीण रुग्णालयातील १०८ ॲम्बुलन्स सेवा २४७ सुरु ठेवण्यात यावे तसेच वारंवार बंद राहणाऱ्या ॲम्बुलन्स सेवेबाबत उच्चस्तरीय चौकशी करणे स्थानिक प्रशासनाने या गंभीर समस्येकडे लक्ष देऊन त्वरित उपाययोजना कराव्यात, अन्यथा नागरिकांच्या जीवाशी खेळल्याचा आरोप निश्चित होईल. या संदर्भात जिल्हा आरोग्य अधिकारी, तहसील प्रशासन आणि आरोग्य मंत्रालयाने लक्ष देण्याचे गरजेचे आहे नसता मोठी दुर्घटना होऊ शकते यामुळे तात्काळ पाटोदा ग्रामीण रुग्णालयातील १०८ म्बुलन्स सेवा वारंवार बंद का असते यांची चौकशी करून कारवाई करण्यात यावी अशी मागणी युवानेते अंगद सांगळे व पाटोदा तालुक्यातील सर्व सामान्य नागरिक करत आहे.

# वेव्हज् : मनोरंजनाची सर्वसमावेशक चळवळ

मनोरंजन व्यवसायात योगदान देणाऱ्या विविध घटकांना एका मंचावर आणून त्यांना परस्पर सहकार्याची आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या देवाण-घेवाणीची संधी उपलब्ध करून देणाऱ्या वेव्हज शिखर परिषदेविषयी

भारत हा मनोरंजन आणि माध्यम उद्योग जगतातला एक आघाडीचा आणि तितकाच महत्त्वाचा देश. भारतात या उद्योग क्षेत्राची प्रगतीही तितक्याच झपाट्याने होत आहे आणि त्यासोबतच या परिसंस्थेच्या अवकाशात सातत्याने होत असलेल्या बदलांसह हे क्षेत्रही तितक्याच सातत्यपूर्णतेने बहरत चालले आहे. आज या क्षेत्राकडे नीट पाहिले तर विविध व्यासपीठांवरच्या आशय निर्मितीनेही मोठी उसळी घेतल्याचे दिसते. यामागचे कारण म्हणजे देशातील वाढत्या डिजिटल प्रसारण सेवा, प्रादेशिक भाषांमधील आशय सामग्री निर्मिती आणि सातत्याने नव्या, खिळवून ठेवणाऱ्या, सर्वसम ावेशकतेची जाणीव करून देणाऱ्या आशयाची वाढती मागणी करत असलेला देशातला तंत्रज्ञानस्नेही प्रेक्षक वर्ग. त्यामुळेच तर आता भारतासाठी हे क्षेत्र केवळ मनोरंजनाचे साधन म्हणून मर्यादित राहिलेले नसून, हे भारतासाठी सांस्कृतिक अभिव्यक्ती, आर्थिक विकास आणि जागतिक पटलावर आपला प्रभाव पाडण्याचे एक सामर्थ्यशाली माध्यम झाले आहे. लवकरच मुंबईत जागतिक दृकश्राव्य मनोरंजन शिखर परिषद (थीश्रव ींवळे तर्ळीीरश्र एपींशीींरळपाशपीं डीाळीं - थतएड) होणार आहे. येत्या १ ते ४ मे २०२५ दरम्यान महाराष्ट्रात, मुंबई इथे ही शिखर परिषद होणार आहे. महत्त्वाचे म्हणजे भारत सरकारनेच या परिषदेचे आयोजन केले आहे. ही परिषद जागतिक पटलावर भारताच्या वाढत्या महत्त्वाचे प्रतिबिंब असलेला एक मंच ठरणार आहे आणि वेव्हज बाजार हा या शिखर परिषदेअंतर्गतचाच एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. खरे तर गेल्या अनेक दशकांपासून मी या क्षेत्रातच जगतो, वावरतो आहे. या इतक्या प्रदीर्घ काळातील माझ्या स्वत:च्या अनुभवांवरून मी एक गोष्ट खात्रीने सांगू शकतो ती म्हणजे कथात्मक मांडणीत लोकांना एकत्र आणण्याची, त्यांना प्रेरित करण्याची आणि एकुणात परिवर्तन घडवून आणण्याची मोठी ताकद असते. याच पार्श्वभूम ीवर वेव्हज आणि वेव्हज बाजाराच्या माध्यमातून भारताने जागतिक मनोरंजन क्षेत्रासाठी एका व्यापक सहकार्यपूर्ण भागीदारीचे आणि सर्वसमावेशक भविष्य घडवण्याच्या दिशेने पाऊल टाकले आहे.




खरे तर वेव्हज बाजार ही ऑनलाइन बाजारपेठेसाठी आखली गेलेली एक क्रांतिकारक संकल्पना आहे. ही ऑनलाइन बाजारपेठ म्हणजे जागतिक मनोरंजन परिसंस्थेअंतर्गतचे व्यावसायिक तज्ज्ञ, उद्योग - व्यवसाय, आणि कलाकारांना परस्परांसोबत जोडून देणारे माध्यम ठरणार आहे. या बाजारपेठेअंतर्गत या क्षेत्रातील परस्पर सहकार्य सुलभ करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले गेले आहे. याद्वारे या क्षेत्रातील व्यावसायिक तज्ज्ञांना नव्या संधी शोधण्याची आणि सहकार्यपूर्ण भागीदारी स्थापित करण्याची संधी मिळणार आहे. या बाजारपेठेला म ाध्यम आणि मनोरंजन क्षेत्रातील एक अभिनव व्यवसाय केंद्र म्हणून स्थान मिळवून देण्याचाच सरकारचा प्रयत्न आहे. भारताचे माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी २७ जानेवारी २०२५ रोजी या अभिनव बाजारपेठेचे औपचारिक उद्घाटन केले होते. आर्थिक क्षेत्रात दावोस शिखर परिषदेचे स्थान आहे, तेच मनोरंजन क्षेत्रात वेव्हज शिखर परिषदेला मिळवून देण्याचा दृष्टिकोन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडला होता. त्या दृष्टीने वेव्हज बाजार महत्त्वाचे साधन ठरणार आहे.

वेव्हज बाजाराच्या अधिकृत संकेतस्थळावर आतापर्यंत, माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राशी संबंधित विविध क्षेत्रांमधील सुमारे ५५00 खरेदीदार, २000 पेक्षा जास्त विक्रेते आणि जवळपास १000 प्रकल्पांसाठी नोंदणी केली गेली आहे. भविष्यात या संकेतस्थळाला माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रासाठीच्या आशय सामग्रीची एक सर्वसमावेशक बाजारपेठ आणि परस्पर संपर्काच्या केंद्राचे स्वरूप प्राप्त करून देणे हा सरकारचा मानस आहे. त्या दृष्टीनेच संकेतस्थळाला कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्रोफाइलिंग म्हणजेच त्या त्या व्यक्तींची व्यावसायिक ओळख करून देण्याची तसेच मागणीनुसार जुळवणी करून देण्याच्या तंत्रज्ञानाचीही जोड दिली गेली आहे. या माध्यमातून ऑनलाइन संकल्पना मांडण्याचे सत्र, ऑनलाइन बीटूबी बैठका (विविध व्यावसायिक प्रतिनिधींच्या बैठका), वेबिनार या आणि अशाच प्रकारच्या इतर महत्त्वाच्या सत्रांचेही आयोजन केले जाणार आहे. ही बाजारपेठ म्हणजे माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राच्या अवकाशातील चित्रपट, दूरचित्रवाणी, ॲनिमेशन, गेमिंग, जाहिरात, वर्धित वास्तव (एक्स्टेंडेड रिॲलिटी), संगीत, ध्वनी संयोजन, नभोवाणी या आणि अशा विविध क्षेत्रांमधील भागधारकांना एकत्र आणणारे एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरणार आहे. हे व्यासपीठ विक्रेते आणि खरेदीदारांतील दुवा ठरेल आणि त्याद्वारे व्यावसायिकांना आपली कौशल्ये सुलभतेने सादर करण्याची, त्यांच्या संभाव्य ग्राहकांसोबत थेट संपर्क साधण्याची आणि उपयुक्त सहकार्यपूर्ण भागीदारीची संधी उपलब्ध करून देत राहील.

एखादा चित्रपट दिग्दर्शक आपल्या चित्रपटासाठी निर्मिती भागीदाराच्या शोधात असेल, एखादा जाहिरातदार योग्य व्यासपीठाच्या शोधात असेल, एखादा गेम डेव्हलपर गुंतवणूकदाराच्या शोधात असेल किंवा एखादा कलाकार आपल्या कलाकृतींना जागतिक स्तरावरील प्रेक्षकांसमोर सादर करू इच्छित असेल, तर अशा सर्वांसाठी वेव्हज बाजारपेठेचा हा मंच म्हणजे परस्पर संपर्क, सहकार्य आणि व्यवसायवृद्धीचे बहुआयामी व्यासपीठ उपलब्ध करून देणारी मोठी जागा किंवा बाजारपेठ असणार आहे.

एका अर्थाने वेव्हज बाजार ही एकप्रकारची समन्वित बीटूबी बैठकांची अभिनव बाजारपेठ आहे, जिने जागतिक म नोरंज क्षेत्रातील परस्पर संपर्क व्यवस्था, परस्पर सहकार्यपूर्ण भागीदारी व्यवस्था, आणि विकासाचा संपूर्ण चेहरामोहरा अगदी क्रांतिकारकरीत्या बदलला आहे. या बाजारपेठेने चित्रपट, दूरचित्रवाणी, संगीत, गेमिंग, ॲनिमेशन, जाहिरात तसेच वर्धित वास्तव (एक्स), आभासी वास्तव (व्हीआर) यांसारख्या जिवंत अनुभूती देणाऱ्या तंत्रज्ञानाशी संबंधित तज्ज्ञ व्यावसायिकांना एकत्र आणणारा मंच उपलब्ध करून दिला आहे. आणि याद्वारे विविध सर्जनशील क्षेत्रांसाठीच्या आशय सामग्रीचे सूचीकरण, त्याचा शोध आणि संबंधित व्यवहारांसाठीचाही एक व्यापक मंच उपलब्ध झाला आहे. चित्रपट वितरणासाठीचा मंचाच्या शोधात असलेले निर्माते, नव्या संकल्पना मांडू पाहणारे गेम डेव्हलपर किंवा लायसन्सिंग संधींच्या शोधात असलेले साऊंड डिझायनर अशा सगळ्यांसाठी वर्गवारीनुसार सूचीकरण, सुरक्षितपणे सादरीकरणे पाहण्याची दालने आणि संपर्क व्यवस्था उपलब्ध करून देत ही संपूर्ण प्रक्रिया सुलभ करणारी बाजारपेठ म्हणून वेव्हज बाजार उदयाला येणार आहे.

या बाजारपेठेच्या माध्यमातून भौगोलिक मर्यादांच्या पलीकडे जात विक्रेते आणि खरेदीदारांना त्यांच्यासाठीचा योग्य भागीदार आणि संधी शोधण्याच्या दृष्टीने सक्षम करणाऱ्या सुविधांचा अंतर्भाव केला आहे. चित्रपट स्टुडिओ, ॲनिमेशन हाऊस, पॉडकास्ट निर्माते, मार्केटिंग यंत्रणा यांसारख्या विक्रेत्यांना आपल्या सेवा आणि त्यांच्याकडची आशय सामग्री जागतिक गुंतवणूकदार, वितरक आणि भागीदारांसमोर सादर करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. दुसरीकडे खरेदीदारांसाठीदेखील उच्च गुणवत्तेचे, आधुनिक काळाशी सुसंगत प्रकल्प या बाजारपेठेमुळे उपलब्ध होऊ लागले आहेत. त्याच वेळी गुंतवणूकदारांसाठीदेखील सहनिर्मितीच्या करारांची आणि व्यापक व्यावसायिक संधींची दारे खुली झाली आहेत. इथे आवर्जून उल्लेख करायला हवी अशी गोष्ट म्हणजे या व्यासपीठाला या उद्योग क्षेत्राशी संबंधित विशिष्ट उपक्रम, सादरीकरणे पाहण्याची दालने, गुंतवणूकदारांबरोबरच्या बैठका - चर्चा आणि कलाकृतींच्या थेट प्रक्षेपण सत्रांसारख्या लाइव्ह स्क्रीनिंगसारख्या उपक्रमांशी जोडले गेले आहे, याम ुळे या व्यासपीठाच्या माध्यमातून केवळ आभासी संवादाच्या पलीकडे जात खऱ्या अर्थाने उपयुक्त असलेले करार आणि व्यवहार प्रत्यक्षात साकारले जातील याचीच सुनिश्चिती झाली आहे.

सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे येत्या १ ते ४ मे २०२५ दरम्यान मुंबईत वांद्रे-कुर्ला संकुलात वेव्हज शिखर परिषद होणार असून त्यावेळी हा वेव्हज बाजारही साकारला जाणार आहे. यानिमि त्ताने उपलब्ध करून दिलेल्या डिजिटल बाजारपेठेवर नोंदणी केलेल्या काही निवडक प्रतिनिधींना या बाजारपेठेत आपल्या संकल्पना मांडण्याची, या उद्योग क्षेत्रातील विविध घटकांसोबत संपर्क प्रस्थापित करण्याची, आघाडीच्या भागधारकांसोबत प्रत्यक्ष करार आणि व्यवहार पूर्णत्वाला नेण्याची मोठी संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. अभिनव दृष्टिकोनामुळे वेव्हज बाजार केवळ एक व्यासपीठ म्हणून मर्यादित राहिलेले नाही, तर ते अधिक स्मार्ट, परस्परांशी अधिक जोडलेले आणि जागतिक पातळीवरील सर्वसमावेशक मनोरंजन क्षेत्राच्या दिशेने सुरू झालेली चळवळच ठरले आहे.

एक कलाकार म्हणून, आम्ही कायमच आव्हानात्मक, प्रेरणादायी आणि चौकटीपलीकडे जाऊन विचार करायला लावणाऱ्या अवकाशाच्या शोधात असतो. वेव्हज हा अशाच प्रकारच्या अवकाशाच्या निर्मितीचा प्रयत्न आहे. दूरदृष्टीने सुरू केलेल्या या वाटचालीचा आपणही एक भाग असल्याचा मला खरोखरच अभिमान वाटतो. ही परिषद आपल्या परस्परांशी संपर्काच्या, कलाकृतींच्या निर्मितीच्या आणि मांडणीच्या पद्धतींमध्ये क्रांतिकारक बदल घडवून आणेल. हा बदल केवळ भारतापुरता मर्यादित नसेल तर त्याचा प्रभाव अवघ्या जगात दिसेल. ही परिषद म्हणजे भारतासाठीचा 'लगान' क्षण आहे. जगभरातील माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रासाठी एकतेचा, धैर्याचा आणि एका अशा दृष्टिकोनाचा क्षण आहे, ज्याचा प्रतिध्वनी आपल्या सीमांच्याही पलीकडे ऐकू येत राहील.

– लेखक : आमिर खान, अभिनेता आणि निर्माते
(सौजन्य: पीआयबी, मुंबई)

पान ४ वरून पुढे...

## रणजीत कासलेच्या...

असतील? असा सवाल करत, निवडणुकीत प्रशासनाचा मोठा गैरवापर झाल्याचे हे स्पष्ट होत आहे, असे देशमुख म्हणाले.

या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी, यासाठी आपण न्यायालयात दाद मागणार असल्याचे राजेसाहेब देशमुख यांनी जाहीर केले आहे. दरम्यान, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी यापूर्वीच धनंजय मुंडे यांच्या आमदारकीच्या निवडीला न्यायालयात आव्हान दिले आहे. त्यामुळे मुंडे यांच्यासमोरील कायदेशीर अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

## गेवराईतील आगरनांदुर...

दि.१८/०४/२०२५ रोजी सकाळी ७ वाजता शेतात गोठ्यावर जनावरांना चारापाणी करण्यासाठी गेलो असता गोठ्यामध्ये बैलजोडी दिसून आली नाही. त्यामुळे मी आजूबाजूला व इतर ठिकाणी बैलांचा शोध घेतला असता ते मिळून आले नाहीत. दोन पांढऱ्या रंगाचे खिलार जातीचे उभे अर्धवट गोलाकार शिंगे असलेले बैल, असे चोरीला गेलेल्या बैलाचे वर्णन असल्याचे सोमानी यांनी फिर्यादीत म्हटले आहे. तरी हे दोन्ही बैल शेतातील गोठ्यातून कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेले आहेत. याप्रकरणी अज्ञात चोरट्यांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास गेवराई पोलिस करत आहेत.

## माजलगाव नपचे...

त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी या मागण्याचे निवेदन देण्यासाठी शिवसेनेचे तालुकाप्रमुख तुकाराम येवले शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके युवा सेनेचे तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे दिनांक १७ एप्रिल रोजी नगरपरिषद कार्यालयामध्ये गेले असता नगर परिषदेमध्ये मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण कार्यालय अधीक्षक प्रमुख कर्मचारी कोणीच उपस्थित नव्हते त्यामुळे या पदाधिकाऱ्यांनी सदर मागण्याचे निवेदन चक्क मुख्याधिकारी यांच्या खुर्चीला दिले आहे आणि दिनांक दोन मे रोजी नागरी समस्या संदर्भात नगरपरिषद कार्यालयासमोर मेन रोडवर रस्ता रोको आंदोलन शिवसेनेच्या वतीने आंदोलन करण्याचा इशारा शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके युवा सेना तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे शिवसेनेच्या महिला आघाडीच्या उपजिल्हाप्रमुख शारदा डोईजड यांनी दिला आहे.

## ह.भ.प.आदिनाथ...

झाले.पार्वतीबाई या अतिशय धार्मिक प्रवृत्तीच्या असल्याने सर्व परिचित होत्या. त्यांच्या पार्थिव देहावर आलापूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात भागवताचार्य परमेश्वर महाराज फपाळ, प्रल्हाद फपाळ, सुना, नातवंडे, पतवांडे असा परिवार आहे. ह.भ.प.आदिनाथ महाराज फपाळ यांच्या आई व बाजार समितीचे लेखापाल उद्धव फपाळ साहेब यांच्या आजी होत.

## तलावातुन बेसुमार....

शिवकुमार स्वामी निवासी उपजिल्हाधिकारी बीड यांचे तहसील प्रशासनाला निर्देश मात्र तहसील प्रशासन गाढ झोपेत

उन्हाळ्यामुळे पाटबंधारे प्रकल्पातील पाणी साठा झपाट्याने कमी होत आहे.जिल्ह्याचा अवर्षण प्रवण ईतिहास पाहता दुर्दैवाने पर्जन्यमानाने ओढ दिल्यास पाणी टंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता.

जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्पाच्या ठिकाणची विद्युत मोटारी व अन्य साधनांद्वारे करण्यात येणारा पाणी उपसा रोखण्यासाठी प्रशासनाने संबंधित पाटबंधारे विभागाचे अधिकारी, कर्मचारी,तहसील कार्यालयाचे कर्मचारी, गटविकास अधिकारी कार्यालयातील कर्मचारी व महावितरण विभागाचे अधिकारी यांची संयुक्त पथके सर्व तहसीलदार यांनी स्थापित करून अवैध पाणी उपश्यावर प्रतिबंध घालण्यात यावा व तसा अहवाल कार्यालयास सादर करण्यात यावा अशा सुचना निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी दिल्या आहेत. मात्र तहसील प्रशासन गाढ झोपेत असल्याचे दिसून येत आहे.

जिल्हा प्रशासनाचे नियोजन ५९ कोटींचा संभाव्य पाणीटंचाई आराखडा फक्त कागदावरच

जिल्ह्यात चांगले पर्जन्यमान झाल्याने ८ एप्रिल पर्यंत एकही टँकर सुरू नाही.गतवर्षी एप्रिल मध्ये १५० तर मे आणि जून मध्ये हा आकडा ४६७ वर गेला होता. जिल्हा प्रशासनाने ३१ मार्च रोजी विभागीय आयुक्तांना संभाव्य पाणी टंचाई गावे निश्चित करून कृती आराखडा पाठवला आहे.त्यामध्ये २४५२ गावांसह १६७६ वाड्यांसाठी योजना राबविण्यासाठी संभाव्य पाणीटंचाई निवारणासाठी ५८ कोटी ९४ लाख ४९ हजार रुपयांचा आराखडा पाठवला आहे.जुन जुलै पर्यंत पाणीटंचाईचा सामना करावा लागणार आहे.त्यामुळे विहिर अधिग्रहण, बोअर अधिग्रहण, टँकर सुरू करणे, तात्पुरती नळ योजना, जुन्या नळयोजनांची दुरुस्ती, नविन विहीरी खोदणे,विहारीतील गाळ काढणे असा संभाव्य टंचाई आराखडा जिल्हा प्रशासनाने तयार करून आयुक्तांकडे पाठवला आहे. मात्र हा आराखडा केवळ कागदावरच राहु नये तर प्रत्यक्षात अमलात आणावा अशी मागणी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

पान १ वरून पुढे...

## रक्त साकळलं,....

असे त्याने म्हटले. त्यामुळे मी पुन्हा सरपंचांना कॉल केला तेव्हा त्यांनी पोलिसांत तक्रार करायला सांगितले. मी तरीही आधी ग्रामविकास अधिकाऱ्याला फोन केला. तो बोलला मी उद्या आल्यावर आवाज कमी करतो. त्यावर मी बोलले की, आवाज सकाळपर्यंत सुरु राहिला तर मी काय करु? मला त्रास होत असल्याने आवाज सहन होत नव्हता. त्यामुळे मी पोलीस ठाण्यात फोन करुन तक्रार केली. पोलिसांनी त्यामध्ये हस्तक्षेप करुन आवाज कमी केला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सरपंच त्याच्या लोकांना घेऊन माझ्या घरी आला. माझ्या आई-वडिलांवर दबाव टाकला. तुम्हाला धार्मिक कार्यक्रम करुन द्यायचे आहेत की नाही, असे त्याने विचारले. या प्रकारानंतर सरपंचाने मुद्दाम पिठाच्या तीन गिरण्या आमच्या घराच्या बाजूला सुरु केल्या. या सततच्या आवाजाने मला गंभीर प्रकारचा मायग्रेन झाला. मला पाठदुखीची समस्याही जडली, असा आरोप ज्ञानेश्वरी अंजान यांनी केला.

जितेंद्र आव्हाडांची सोशल मीडियावर पोस्ट- हा प्रकार १४ एप्रिलला घडल्याचे समजत आहे. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला असला तरी ज्ञानेश्वरी अंजान यांना एफआयआरची प्रत देण्यात आलेली नाही. यासंदर्भात शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी ट्विट केले होते. अंबाजोगाई सत्र न्यायालयात वकिली करणाऱ्या महिलेला सरपंच आणि त्याच्या कार्यकर्त्यांकडून शेतात रिंगण करून काठ्या आणि जे.सी.बी पाईपने जबर मारहाण करण्यात आली. महिलेने गावातील ध्वनिप्रदूषणामुळे मायग्रेनचा त्रास होत असल्याने आवाज कमी करावा , लाऊडस्पीकर लाऊ नयेत घरापुढील पिठाच्या गिरण्या काढाव्यात याबाबत कार्यालयीन तक्रारी दिल्या होत्या. यात महिला बेशुद्ध पडल्यानंतर दवाखान्यातूनही एका रात्रीत उपचार करून घरी पाठवलं आहे. सरपंच आणि इतर दहा पुरूषांनी मिळुन एका वकील असलेल्या स्त्रीला मारहाण करणं कितपत योग्य? गावात सरपंचाचा कारभार कसा असेल कोणत्या पक्षाचा हा सरपंच आहे?, असे जितेंद्र आव्हाड यांनी आपल्या ट्विटमध्ये म्हटले आहे.

## बीड पोलिसांना...

आहेत. आरोपींसोबतच पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांची मिलीभगत असल्याचे अनेक प्रकरणांवरून समोर आले. त्यांच्यावर निलंबण करण्यात आले, परंतू त्यांच्या ठाणे प्रमुखांना पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी अभय दिले. त्यातच चोरी, घरफोडीसह इतर गुन्हे काही केल्या थांबायला तयार नाहीत. जानेवारी ते मार्च या तीन महिन्यात ३४२ चोऱ्यांचे गुन्हे दाखल आहेत. त्यातील केवळ ११० च उघड झाले आहेत. त्यामुळे पोलिसांच्या कामगिरीवरही प्रश्न उपस्थित केला जात आहे. अधीक्षक काँवत यांच्याकडून केवळ सुधारणा झाल्याचा दावा केला जात आहे, प्रत्यक्षात मात्र जैसे थे च परिस्थिती असल्याचे दिसत आहे.

ठाणेदारांना झापायचे अन् एलसीबीला अभय ?- स्थानिक गुन्हे शाखेत पाच अधिकारी आणि ४० च्या जवळपास कर्मचारी आहेत. त्यांनी चोरी, घरफोडी, जबरी चोरी, दरोडा असे गुन्हे उघड करणे आवश्यक आहे. परंतू येथील प्रमुख पोलिस निरीक्षक उस्मान शेख यांच्यासह शाखेतील अनेकांवर आ. सुरेश धस यांनी गंभीर आरोप झाले. त्यांचे काम फारसे समाधानकारक नाही. एखादा गुन्हा उघड झाला की एसपींसमोर जावून सांगायचे आणि पाठ थोपटून घ्यायची, असा प्रकार काही दिवसांपासून सुरू आहे. अधीक्षक काँवत यांच्याकडूनही ठाणेदारांची जसे कान टोचले जातात, तसे या शाखा प्रमुखांचे का टोचत नाहीत? हा प्रश्न आहे. या शाखेला काँवत यांचे अभय आहे का? असा प्रश्न आहे. बसस्थानकात चोऱ्या वाढल्या- बीड, केज या बसस्थानकातून महिलांच्या गळ्यातील दागिने, पुरूषांच्या खिशातील पैसे चोरल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. त्या रोखण्यातही पोलिसांना पूर्णपणे अपयश आले आहे. त्यांचा तपासही लागत नसल्याने पोलिसांबद्दल संताप व्यक्त होत आहे.

## डॉ.ज्योती मेटे...

रूग्णालयात रविवारी (दि.१३) पहाटे घडली. याप्रकरणाला मयत मातेच्या नातेवाईकांनी डॉक्टर आणि नर्स जबाबदार असल्याचा आरोप केला होता. त्यानंतर आणखी दोन महिला प्रसूतीसाठी दाखल झाल्यानंतर मृत्युमुखी पावल्या या घटनेमुळे शिवसंग्राम अध्यक्ष डॉक्टर ज्योती मेटे यांनी आक्रमक पवित्रा घेत आज सकाळी जिल्हा रुग्णालयाला भेट दिली यावेळी त्यांनी प्रसूती विभागाची पाहणी केली आणि रुग्णालय प्रशासनाला जाब विचारत धारेवर धरले.

## बनकरंजा येथील...

व बौद्ध नगर या दोन ठिकाणी नाली काम आवश्यक असताना अवघ्या १५ ते १० फुटामध्ये एलईडी बल्ब बसवून पैसे उचलण्याचा प्रकार सुरू आहे हा शासनाचा निधी योग्य प्रकारे वापरण्यात यावा व अधिकारी गुत्तेदार यांच्यावर चौकशी करून कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी. दलित वस्ती अंतर्गत साठे नगर व बौद्ध नगर या भागात पहिलेच एलईडी लाईट चालू असताना पोलशेजारी पोल उभे करून निव्वळ पैसे उचलून स्वतःचं घर भागवण्यासाठी अधिकारी व गुत्तेदार यांनी या निधीचा चुकीचा प्रकारे वापर केल्याचा दिसून येत आहे पैसे शिल्लक राहावेत म्हणून नालिकाम न करता पोल सह एलईडी बसवण्याचे काम ग्रामपंचायत गुत्तेदार व अधिकारी यांच्या संगणमताने झालेले आहे या शासनाच्या निधीचा योग्य वापर व्हायला पाहिजे मात्र काही अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे शासनाचा निधी जनतेच्या उपयोगी न येता स्वतःचे घर भरण्यासाठी या निधीचा उपयोग केला जात असल्याचं बनकरंजा येथील साठे नगर व बौद्ध नगर या भागातील कामावरून दिसून येत आहे याकरिता अधिकारी व गुत्तेदार यांची चौकशी करून त्यांच्यावर योग्य ते कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# अपघातग्रस्त रुग्णांसाठी एक लाख रुपयांपर्यंतचे कॅशलेस उपचार: सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर

**• रुग्णालयांची माहिती, बेडची उपलब्धता आणि तक्रारी नोंदविण्यासाठी स्वतंत्र मोबाईल ॲप विकसित करण्याचा निर्णय**

मुंबई । प्रतिनिधी

रुग्णांना वेळेवर दर्जेदार तसेच कॅशलेस उपचार मिळावेत यासाठी रुग्णालये, सोसायटीचे अधिकारी व अंमलबजावणी संस्थांना कठोर दक्षता बाळगावी. यात गैरप्रकार करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. तसेच अपघातग्रस्त रुग्णांसाठी एक लाख रुपयांपर्यंतचे कॅशलेस उपचार अंगीकृत व अन्य तातडीच्या रुग्णालयांमधून देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने कार्यवाही करावी, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.

राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या वरळी, मुंबई येथील मुख्यालयात आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनांच्या कामकाजाचा आढावा मंत्री श्री. आबिटकर यांनी घेतला. यावेळी आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे, राज्य आरोग्य हमी सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण, उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.दयानंद जगताप, सार्वजनिक




आरोग्य विभागाचे सहसचिव अशोक आत्राम, सहायक संचालक डॉ.रवींद्र शेटे आदि उपस्थित होते. बैठकी दरम्यान मंत्री श्री.आबिटकर यांनी या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. यामध्ये योजनेतील अंगीकृत रुग्णालयांची संख्या १७९२ वरून ४१८० पर्यंत वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत ही निवड प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबविण्याचे त्यांनी आदेश दिले.

या योजनेतील उपचार संख्येत वाढ, दरामध्ये सुधारणा, अवयव प्रत्यारोपणासारखे महागडे उपचार समाविष्ट करणे, तसेच प्राथमिक आरोग्य सेवाही योजनेत समाविष्ट करण्यासाठी अभ्यास समिती गठित करण्यात आली असून एक महिन्याच्या आत अहवाल सादर करण्याचे आदेश मंत्री श्री.आबिटकर यांनी यावेळी दिले. जनतेसाठी योजनेतील रुग्णालयांची माहिती, बेडची उपलब्धता आणि तक्रारी नोंदविण्यासाठी स्वतंत्र मोबाईल ॲप विकसित करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. प्रत्येक अंगीकृत रुग्णालयाने दर महिन्याला एक आरोग्य शिबिर आयोजित करून किमान पाच रुग्णांवर कॅशलेस उपचार करावेत, अशा शिबिरात लोकप्रतिनिधींना सहभागी करून घेऊन त्याची पूर्वप्रसिद्धी करावी, असे मंत्री श्री.आबिटकर यांनी यावेळी सांगितले.

योजनेच्या अंमलबजावणीसाठी पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावर समित्या स्थापन करून त्यांच्या बैठका त्वरित आयोजित करण्यात याव्यात. तसेच आयुष्मान कार्ड वाटप मोहिमेस गती देण्यासाठी आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, रेशन दुकानदार आणि नागरी सेवा केंद्रांच्या माध्यमातून वाटप करण्याची योजना आखण्यात आली आहे. या कार्यासाठी त्यांना मिळणाऱ्या मानधनात वाढ करण्याचे निर्देशही मंत्री. श्री.आबिटकर यांनी यावेळी दिले.

रुग्णालयांना मार्च महिन्यापासून सुमारे १,३०० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आल्याचे सांगून, यापुढेही आवश्यक निधी वेळोवेळी दिला जाईल. या महत्त्वाकांक्षी योजनेची अंमलबजावणी पूर्ण पारदर्शकपणे केली जावी आणि कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार सहन केला जाणार नाही, असे स्पष्ट निर्देश आरोग्यमंत्री श्री.आबिटकर यांनी यावेळी दिले.

# छत्रपती संभाजीनगर येथे महाराणा प्रतापसिंह यांच्या अश्वारूढ पुतळयाचे लोकार्पण

## महाराणा प्रतापसिंह यांचा पुतळा प्रेरणास्थान- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस
## महाराणा प्रतापसिंह यांचा पुतळा प्रेरणा व शौर्याचे प्रतिक - केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

महाराणा प्रतापसिंह एक राष्ट्रभक्त होते ते शेवटपर्यंत देशासाठी लढत राहिले. छत्रपती संभाजीनगर येथे उभारण्यात आलेला त्यांचा पुतळा आपल्या सर्वांसाठी प्रेरणास्थान आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

महाराणा प्रतापसिंह यांचा इतिहास अतिशय गौरवशाली आहे. देशाच्या संरक्षणासाठी त्यांनी प्रदिर्घ संघर्ष केला. त्यामुळे ते भारताचे जननायक म्हणून मानले जातात, छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचा उभारण्यात आलेला पुतळा आजच्या पिढीसाठी प्रेरणास्त्रोत आहे, खऱ्या अर्थाने महाराणा प्रतापसिंह यांचा पुतळा प्रेरणा व शौर्याचे प्रतिक आहे, असे मत केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी व्यक्त केले.

छत्रपती संभाजीनगर येथील महानगरपालिकेच्या कॅनॉट गार्डन येथे आज महाराणा प्रतापसिंह यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते व मुख्यमंत्री



देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाले, त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे, पालकमंत्री संजय शिरसाट, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, पणन मंत्री जयकुमार रावल, विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, खा. डॉ. भागवत कराड, खा. संदीपान भुमरे, आ. प्रदीप जैस्वाल, आ. नारायण कुचे, आ. अनुराधा चव्हाण, आ. संजय केनेकर, महाराणा प्रतापसिंह यांचे वंशज लक्ष्यराज सिंह यांच्यासह महानगरपालिका आयुक्त जी. श्रीकांत उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांचा अश्वारूढ पुतळा हा छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या माध्यमातून उभारण्यात आला आणि भारताचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी त्याचे अनावरण केले, याचा आनंद आहे. छत्रपती संभाजीनगर शहरात एकीकडे छत्रपती शिवाजी महाराज आणि दुसरीकडे वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांचा पुतळा आहे. त्यामुळे प्रेरणेची कमतरता या ठिकाणी असणार नाही. महाराणा प्रतापसिंह एक राष्ट्रभक्त, देशभक्त होते, ते शेवटपर्यंत देशासाठी लढत राहिले. स्वराज्यासाठी महाराणा प्रतापसिंह, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांनी आपल्या जीवनाचे बलिदान दिले पण मोगलांचे कधीही मांडलिकत्व स्वीकारले नाही. आज आपण खऱ्या अर्थाने या वीरपुरूषांमुळेच स्वातंत्र्य उपभोगत आहोत. या ठिकाणी असलेला महाराणा प्रतापसिंह यांचा पुतळा केवळ पुतळा नाही तर एक प्रेरणास्त्रोत आहे. या वीर पुरूषांच्या प्रेरणास्त्रोताच्या माध्यमातूनच स्वतंत्र भारताला विकसित भारताकडे नेण्याचा संकल्प देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केला जात आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाची मानके, देशाच्या समृद्ध वारसाला पुनर्रचित करण्याचे काम सुरू आहे. अशा या पर्वामध्ये छत्रपती संभाजीनगरमध्ये पुन्हा एकदा आम्हाला प्रेरणा देण्यासाठी महाराणा प्रतापसिंह पुतळयाच्या माध्यमातून विराजमान झाले आहेत. मी खरोखर संभाजीनगरकरांचे मनापासून अभिनंदन करतो. वीर पुरूषांच्या मार्गाने चालण्याचा निर्धार आपण करूयात, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह म्हणाले की, महाराणा प्रतापसिंह यांच्या पुतळयाचे अनावरण माझ्या हस्ते झाले याचा मला मनस्वी आनंद आहे. हा पुतळा प्रेरणा, आदर्श, साहस यांचे खरे प्रतिक आहे. महाराणा प्रतापसिंह हे देशाचे जननायक आहेत, त्यांची प्रेरणा आजच्या पिढीने घेण्याची गरज आहे. छत्रपती शिवाजी महाराज, महाराणा प्रतापसिंह यांचा खरा इतिहासही आजच्या पिढीने जाणून घ्यावा. या महापुरूषांनी कधीही भेदभाव केला नाही, त्यांनी कायम जनहितासाठी कार्य केले.

## पीएम श्री.मा.शाळा पाली येथे योग प्रशिक्षणाचा समारोप




बीड । प्रतिनिधी

मौजे पीएमश्री माध्यमिक शाळा पाली येथे मागील तीन महिन्यापासून योग प्रशिक्षक पंढरीनाथ क्षीरसागर सर यांच्या मार्गदर्शनाखाली योग शिबिर संपन्न झाले.

पंढरीनाथ क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांना योगा विषयी जनजागृती घडावी तसेच विद्यार्थ्यांचे आरोग्य चांगले राहावे या दृष्टीने विद्यार्थ्यांमध्ये कपालभाती, वृक्षासन, ताडासन, भामरी, सूर्यनमस्कार, असे विविध प्राणायामचा सराव करून विद्यार्थ्यांकडून घेतला तसेच विद्यार्थ्यांची योग परीक्षेचे आयोजन करण्यात आले ही परीक्षा प्राथमिक व माध्यमिक अशी दोन गटात घेण्यात आली. योग प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक, मानसिक, आरोग्य चांगले राहण्यास मदत होणार आहे यातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक फायदा होणार आहे.

आज समारोप करण्यात आला यावेळी आदरणीय क्षीरसागर सर यांचा शाळेतील सर्व शिक्षकांनी सत्कार करण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक लाडसर हे होते कार्यक्रमाचे संचालन राठोड सर यांनी केले यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी व काब्दे मॅंडम, तळेकर सर,पायके सर, हंगे मॅंडम, म्हैत्रे मॅंडम,शिक्षकांनी मनोगत व्यक्त केले,यावेळी सर्व विद्यार्थी उपस्थित होते

# शॉर्टसर्किटने लागलेल्या आगीत शेडनेट जळून खाक



शिरूर । प्रतिनिधी

शेतात पीक घेण्यासाठी उभारण्यात आलेल्या शेडनेटला शार्टसर्किटने आग लागली. या आगीत शेडनेट, ड्रिप्स, फवारणी करण्यासाठी लागणारे विविध साहित्य जळून खाक झाले. ही घटना शुक्रवारी (दि. १८) दुपारी २ च्या सुमारास घडली. यामध्ये शेतकऱ्यांचे ३० लाखाचे नुकसान झाले आहे.

खालापुरी येथील शेतकरी बळीराम मारुती उगले यांनी आपल्या शेतामध्ये विविध पिके घेण्यासाठी गेल्यावर्षीच पोखरा योजने अंतर्गत सुमारे ३० लाख रुपये खर्च करून एक एकरमध्ये शेडनेटची उभारणी केली होती. यामध्ये झेंडू, टोमॅटो, ढोबळी मिरची, वांगी, टरबूज अशी

विविध पिके त्यांनी घेतली होती. या शेतापासून काही अंतरावरून विद्युत वहिनी तारा गेलेल्या आहेत. या तारांवर शॉर्टसर्किट होऊन आज (शुक्रवारी) दुपारी आगीच्या ठिणग्या जमिनीवरती पडल्या आणि वाळलेल्या गवताने पेट घेतला. इथूनच काही पावलांच्या अंतरावर बळीराम उगले यांचे शेडनेट होते. ही आग पसरत गेल्याने शेडनेटला आग लागून ते काही क्षणात जळून खाक झाले. यामध्ये ठिबकचे पाईप, पिकांना फवारणी करण्यासाठी लागणारे स्प्रिंकलर, विद्युत मोटार पाईप या वस्तूही जळाल्याशेतकऱ्याच्या नुकसानीचा पंचनामा करण्यासाठी तहसील कार्यालय, कृषी कार्यालय, विद्युत वितरण कंपनी या सर्वांना माहिती देऊनही केवळ लाईनमन भोसले व कृषी सहाय्यक हनुमान सानप यांनी घटनास्थळी भेट देऊन घटनास्थळाची पाहणी केली मात्र झालेल्या नुकसानीचा पंचनामा करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांना अद्याप वेळ मिळाला नाही, असा आरोप शेतकऱ्याने केला आहे.

# धनादेश न वटल्याने न्यायालयाने आरोपीस दिली एक वर्ष कारावासाची शिक्षा-ॲड.वंदना वाघमारे

## धनादेशावरील रक्कम व सदरील रक्कमेवर तक्रार दाखल केल्यापासून ६% व्याज देण्याचा आदेश

बीड । प्रतिनिधी

घरगुती अडचणींचे निवारणाकरिता ६ लाख रुपये हातउसने घेतले होते. सदरील ६ लाख रुपयाची फिर्यादीने मागणी केली असता आरोपीने ६ लाख रुपयाचा धनादेश दिला व तो बँकेत वटला जाईल याची शाश्वती दिली परंतू सदरील धनादेश पुरेशी रक्कम नसल्याने वटला न गेल्याने तो परत आला यानंतर फिर्यादीने आरोपीच्या विरोधात बीड येथील मा.सहावे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात तक्रार दाखल केली होती यावर दि.०८.०४.२०२५ रोजी न्यायालयाने आरोपीस दिली एक वर्ष कारावासाची शिक्षा व धनादेशावरील रक्कम व सदरील रक्कमेवर तक्रार दाखल केल्यापासून ६% व्याज देण्याचा आदेश पारित केला आहे. याबाबत माहिती अशी की, शहरातील कविता विष्णु देशमाने यांनी पार्वती मारुती साळवे यांच्याकडून ६ लाख रुपये घरगुती अडचणी निवारणाकरिता घेतले होते. पुढे पार्वती साळवे यांनी दिलेले पैसे परत मागितले असता कविता देशमाने यांनी ६ लाख रुपयांचा धनादेश दिला. सदरील धनादेश पार्वती साळवे यांनी स्वतः चे खाते असलेल्या स्टेट बँक ऑफ



हैद्राबाद येथे वटविण्याकरिता टाकला असता तो फंण्ड इन सफिशिअण्ट या शेर्याने परत आला. या नंतर कविता देशमाने यांच्या विरोधात पार्वती साळवे यांनी ॲड.ए.जे.सुतार आणि ॲड. वंदना वाघमारे(साळवे)यांच्या मार्फत मा.सहावे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात तक्रार दाखल केली त्यानंतर दि.०८ एप्रिल २०२५ रोजी अंतीम सुनवाई होवून आरोपी यांना १ वर्ष कारावासाची शिक्षा व ६ लाख रुपये तसेच सदरील रक्कमेवर तक्रार दाखल केल्यापासून ६% व्याज देण्याचा आदेश न्यायालयाने दिला आहे. यावेळी फिर्यादीच्या बाजूने ॲड.ए.जे. सुतार आणि ॲड.वंदना वाघमारे (साळवे)यांनी काम पाहिले त्यांना ॲड.सरपते, ॲड.सोळंके, ॲड.फारुक, ॲड.सायली सुतार यांचे सहकार्य लाभले.

# द.बा. घुमरे पब्लिक स्कूलच्या विद्यार्थीनीचे राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये सुयश

बीड । प्रतिनिधी

नुकत्याच पुणे येथे लेक्रॉस राज्यस्तरीय अजिंक्य स्पर्धा संपन्न झाल्या. या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये बीड जिल्हा संघामध्ये द.बा. घुमरे पब्लिक स्कूल बीडच्या खेळाडूंनी यात सहभाग घेतला होता. या स्पर्धेमध्ये त्यांनी अत्यंत उत्कृष्ट कामगिरी करत बीड जिल्हा संघाने या स्पर्धेत प्रथम पारितोषिक पटकावले. यामद्ये कु बंड अक्षता, कु नागरगोजे ज्ञानेश्वरी, कु जाधव सिद्धी ,कु हाडूळे तनुजा, कु मुळे श्रावणी या खेळाडू विद्यार्थिनी सहभागी होत्या त्यांच्या या यशाबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, संस्थेचे सचिव



दीपकदादा घुमरे, संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती घुमरे एम.डी. मॅडम, लेक्रॉस जिल्हा संघटनेचे अध्यक्ष रामदास गिरी, द बा घुमरे पब्लिक स्कूल बीड शाळेचे मुख्याध्यापक (माध्य) एम.आर. शेंडगे, क्रीडा प्रशिक्षक विशाल गिरी, जाधव व्ही.एस. शाळेतील सर्व शिक्षक, विद्यार्थी, अन्य प्रशिक्षक व पालकांनी खेळाडू मुलींचे कौतुक केले व पुढील स्पर्धे साठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

दैनिक
# मराठवाडा पत्र
● epaper.marathwadapatra.com

शनिवार, दि.१९ एप्रील २०२५ पान ४

## पाटोद्यात शासकीय गोदाम फोडले

पाटोदा । प्रतिनिधी

शहरातील ग्रामीण रुग्णालयाच्या शेजारी असलेल्या शासकीय धान्य दुकान गोदामाच्या खिडकीचे गज तोडून आत प्रवेश करत अज्ञात चोरटयांनी गव्हाचे व तांदळाचे ११ कट्टे लंपास केल्याची घटना (दि.१४) सोमवार रोजी घडली असून अज्ञात चोरट्यांविरुद्ध पाटोदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पाटोदा शहरातील ग्रामीण रुग्णालयाच्या शेजारी असलेल्या शासकीय धान्य दुकान गोदामाच्या खिडकीचे गज तोडून आत प्रवेश करत अज्ञात चोरटयांनी गव्हाचे ७ व तांदळाचे ४ असे मिळून एकूण ११ कट्टे लंपास केल्याची घटना (दि. १४) सोमवार रोजी घडली असून एकूण ११,००० हजारांचा मुद्देमाल लंपास केल्याप्रकरणी सोमनाथ अशोक होळकर (वय ३२) यांच्या फिर्यादीवरून (दि.१६) बुधवार रोजी पाटोदा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

# रणजीत कासलेच्या आरोपानंतर तपासातून धक्कादायक माहिती समोर

● राजकारणात एकच खळबळ





बीड । प्रतिनिधी

बीडमधील निलंबित पोलीस अधिकारी रणजीत कासले यांनी माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर केलेल्या गंभीर आरोपांमुळे राजकीय वातावरण तापले आहे. निवडणुकीदरम्यान ईव्हीएमपासून दूर राहण्यासाठी १० लाख रुपये घेतल्याच्या कासले यांच्या दाव्यानंतर, मुंडे यांचे प्रतिस्पर्धी उमेदवार राहिलेले राजेसाहेब देशमुख आता न्यायालयात जाण्याच्या तयारीत आहेत.

कासलेंचे आरोप आणि अटक- रणजीत कासले यांनी आरोप केला आहे की, परळी विधानसभा निवडणुकीवेळी ईव्हीएममध्ये छेडछाड झाली आणि त्यांना या प्रक्रियेपासून दूर ठेवण्यासाठी धनंजय मुंडे यांच्या निकटवर्तीयांकडून त्यांच्या बँक खात्यात १० लाख रुपये जमा करण्यात आले. कासले यांनी वाल्मिक कराड याच्या एन्काऊंटरसाठी मुंडेंनी ऑफर दिल्याचा दावाही पुन्हा केला.

पुणे विमानतळावर उतरल्यानंतर बीड पोलिसांनी रणजीत कासले यांना अटक केली. अटकेपूर्वी त्यांनी माध्यमांशी बोलताना धनंजय मुंडे, मुख्यमंत्री फडणवीस, बीड पोलीस आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप केले होते. हे प्रकरण सध्या बीड जिल्ह्याच्या राजकारणात केंद्रस्थानी आहे.

कासले यांच्या आरोपांनंतर, परळी मतदारसंघातून धनंजय मुंडे यांच्या विरोधात निवडणूक लढवलेले राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी प्रतिक्रिया दिली आहे. जर एकट्या कासलेला १० लाख दिले, तर इतरांना किती वाटले ▶▶ उर्वरित पान २ वर

## गेवराईतील आगरनांदुर येथून बैलजोडी चोरीला



गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील आगर नांदूर येथे शेतातून बैलजोडी चोरल्याची भलतीच घटना शुक्रवारी सकाळी समोर आली आहे. बालाप्रसाद किसनलाल सोमानी या शेतकऱ्याच्या गट क्रमांक २६३ मधील शेतामध्ये बांधलेली जवळपास १ लाख रुपये किंमतीची बैलजोडी चोरांनी पळवून नेली आहे, यामुळे शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

गेवराई तालुक्यातील आगर नांदूर शिवारात बालाप्रसाद किसनलाल सोमानी यांची गट नं.२६३ मध्ये शेती आहे. या शेतातील गोठ्यात बांधलेली बैलजोडी चोरीला गेल्यास परिसरात खळबळ उडाली आहे. दरम्यान बालाप्रसाद सोमाणी यांनी पोसीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, आगर नांदूर येथे मी माझे कुंटुबासह राहतो. मी शेतीचा व्यवसाय करून उदरनिर्वाह चालवितो माझ्याकडे आगार नांदूर शिवारात गट.नं. २६३ मध्ये आठ एकर शेती आहे. शेतीच्या मशागतीसाठी माझ्याकडे बैलजोडी आहे. त्यांचेसाठी गट. नं. २६३ मध्ये गोटा बांधलेला आहे. दि. १७/०४/२०२५ रोजी सांयकाळी सात वाजण्याच्या सुम ारास मी माझे शेतातील गट नं २६३ मध्ये असलेल्या गोठ्यावरून जनावरांना चारापाणी करून घरी आलो.

▶▶ उर्वरित पान २ वर

## महिलेकडून वकिलीचा दुरुपयोग! गावकऱ्यांनी मारहाणीचे आरोप फेटाळले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून बीड जिल्ह्यात घडत असलेल्या घटनांमुळे राज्याच्या केंद्रस्थानी आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणाची धग कायम असतानाच एका वकिल महिलेला संरपंचासह १० जणांनी बेदम मारहाण केल्याची घटना घडली. या घटनेबद्दल गावकऱ्यांनी आपली प्रतिक्रिया दिलीयं. संबंधित महिला तिच्या वकीलीचा दुरुपयोग करत असल्याचा आरोप गावकऱ्यांकडून करण्यात आलायं. पीडित महिला वकिली शिकून आल्याने कायद्याचा गैरवापर करीत असून गिरणी बंद करावी म्हणून तक्रारी देत आहे. गावात धार्मिक कार्यक्रम करु देत नाही. गावातील अनेकांवर महिलेने खोटे गुन्हे दाखल केलेले आहेत. कायद्याचा अभ्यास असल्याने वाट्टेल तसं ती वागत आहे. तिला गावातल्या लोकांनी मारहाण केलेली नाही. त्यांच्या घरातल्या भांडणामुळे तिला मारहाण झाली असेल, पण तिने केलेले सगळे आरोप खोटे आहेत. असं गावकऱ्यांनी म्हटलंय.



*बीड शहराला सुरळीत पाणीपुरवठा व्हावा यासाठी नगर पालिकेने नविन पाईपलाईन जोडणी व दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे. शुक्रवारी (दि.१८) रोजी आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांनी पाईप लाईन जोडणीचे काम सुरू आसलेल्या उमरद खासला, म्हाळसजवळा येथे भेट दिली. सदरील काम वेळेत पुर्ण करून शहराला पाणीपुरवठा पुर्ववत करण्याच्या सुचना आ.क्षीरसागरांनी संबंधितांना दिल्या.*

## माजलगाव नपचे मुख्याधिकारी ओएस हजर नसल्याने शिवसेनेने आंदोलनाचे निवेदन दिले खुर्चीला

**पालिकेकडून मूलभूत सुविधा मिळेना ; शहरातील विविध समस्यासाठी शिवसेनेचे दोन मे ला रस्ता रोको आंदोलन**



माजलगाव । प्रतिनिधी


शहरातील विविध नागरी समस्या चे निवेदन देण्यासाठी नगरपरिषद मध्ये मुख्याधिकारी व कार्यालय अधीक्षक गैरहजर असल्यामुळे शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी चक्क मुख्याधिकाऱ्यांच्या खुर्चीला निवेदन देऊन नागरी समस्या साठी दोन मे रोजी रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

शहरांमध्ये ठिकठिकाणी कचऱ्याचे ढिगारे मुख्य रोडवर सिंदफणा पुलाच्या जवळ कचऱ्याचे ढिगारे गल्लीबोळात तुंबलेल्या नाल्या यामुळे पसरलेली दुर्गंधी शहरात स्वच्छता पावसाळ्यापूर्वी मोहीम राबवण्यात यावी मुख्य रस्त्यासह गल्लीबोळातील विद्युत पूलवर लाईट बसविण्यात यावे त आणि मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण यांच्या २० महिन्याच्या कार्यकाळातील कारभाराची चौकशी करण्यात यावी व

▶▶ उर्वरित पान २ वर

## महाराष्ट्र राज्यात मुख्यमंत्र्याच्या लाडक्या बहिणीवर निर्घृण हल्ला मग राज्यात महिलांना संरक्षण आहे का नाही? : स्वाती कातखडे

पाटोदा । प्रतिनिधी



अंबाजोगाई येथील सत्र न्यायालयात वकिली करणाऱ्या एका महिला वकीलावर, गावातील सरपंच आणि त्याच्या कार्यकर्त्यांनी शेतामध्ये रिंगण करून काठ्या व जे.सी.बी. पाईपने अमानुष मारहाण केली. मुख्यमंत्र्यांनी लाडकी बहीण योजना आणली पण राज्यात महिला सुरक्षित आहेत का असा मोठा प्रश्न उपस्थित होत असून या घटनेमुळे संतापाची लाट उसळली आहे अशी प्रतिक्रिया स्वाती कातखडे (जिल्हाध्यक्षा, सावता सेना महिला आघाडी) यांनी संतप्त प्रतिक्रिया देत सांगितले की,जर मुख्यमंत्र्यांची लाडकी बहिण सुरक्षित नाही, तर राज्यातील इतर परिस्थितीचं काय ? हे सरकार गुन्हेगारांना पाठीशी घालत आहे. आम्ही याचा तीव्र निषेध करतो. मुख्यमंत्र्यांनी गृहमंत्री पदाचा तात्काळ राजीनामा द्यावा.दोषींवर तत्काळ गुन्हा दाखल करून अटक करण्यात यावे पीडितेला न्याय मिळवून द्यावा गृहमंत्री पदाचा नैतिकतेच्या आधारे राजीनामा घ्यावा. महिलांच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र तपास यंत्रणा स्थापन करण्यात यावी- जर सरकारने यावर तातडीने कारवाई केली नाही, तर सावता सेना महिला आघाडी जिल्हाभर तीव्र आंदोलन छेडेल, असा इशाराही स्वाती कातखडे यांनी दिला आहे.

## ह.भ.प.आदिनाथ महाराज यांना मातृशोक पार्वतीबाई फपाळ यांचे दु:खद निधन



माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील आलापुर येथील रहिवासी असलेल्या पार्वतीबाई त्रिंबकराव फपाळ वय १०१ वर्षे यांचे वृद्धापकाळाने आज दि. १८ एप्रिल २०२५ रोजी निधन ▶▶ उर्वरित पान २ वर

# तलावातुन बेसुमार पाणी उपसा सुरूच







बीड । प्रतिनिधी

उन्हाचा पारा वाढत असल्याने पाण्याचा वापर आणि बाष्पीभवनाचा वेग आधिकच वाढला आहे.परीणामी तलावातील पाणी दिवसेंदिवस कमी होत आहे.जिल्ह्यातील १६७ प्रकल्पांमध्ये सध्या १८३ दलघमी ( २३.८८ टक्के ) एवढाच उपयुक्त पाणीसाठा आहे.आता १४५ प्रकल्पातील पाणीसाठा निम्म्यापेक्षा कमी आहे.४५ प्रकल्पातील पाणी जोत्याखाली गेले आहे.१२ प्रकल्प कोरडे ठाक पडले आहेत.जिल्ह्याची पावसाची वार्षिक सरासरी ५३६ मिलीमिटर आहे.गतवर्षी तब्बल ८३७ मिलीमीटर एवढ्या पावसाची नोंद झाली होती त्यामुळे सगळे प्रकल्प ओसंडून वाहत होते.परंतुआता प्रकल्पातील पाणी कमी होण्यासह शेतातील विहीरी, सार्वजनिक पाणी योजनेच्या विहिरी,विंधन विहिरी कोरड्या पडत चालल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण भागात पाणी टंचाईच्या झळांचा सामना करावा लागणार आहे. याचवेळी

जिल्हा प्रशासनाने ३१ मार्च रोजी आयुक्तांना संभाव्य पाणीटंचाई निवारणासाठी ५८ कोटी १९ लाख ४९ हजार रुपये निधीची आवश्यकता असल्याचे कळवले असुन तसे नियोजन सुरू आहे मात्र संभाव्य पाणी टंचाई अनुषंगाने निवासी उपजिल्हाधिकारी बीड शिवकुमार स्वामी यांनी अनाधिकृत पाणी उपसा बंद ठेवण्याबाबत तहसीलदारांना दिलेल्या सुचना कागदावरच राहिल्या असुन तालावातुन पाण्याचा बेसुमार उपसा सुरू असल्याचे निदर्शनास आले असुन कागदी घोडे नाचवण्यात जिल्हा व तहसिल प्रशासन समाधान मानत असुन संभाव्य पाणीटंचाई रोखण्यासाठी वास्तविक तहसीलदार यांनी नेमलेल्या पाटबंधारे विभाग, तहसील विभाग, महावितरण विभाग आणि गटविकास अधिकारी कार्यालयातील अधिकारी यांच्या संयुक्त पथकाने अवैध पाणी उपश्यावर प्रतिबंध घालावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी बीड यांना केली आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर